# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०४/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## पोलीस स्टेशन उमरेड येथे अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत दिनांक २९/०४/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. सुमारास पोलीस पथक पोस्टे परिसरात पेट्रोलींग करित असतांना पोलीस पथकास गोपनिय माहीती मिळाल्यावरुन एमआयडीसी उमरेड मार्गे नागपूर येथे टिप्परव्दारे अवैध रेती वाहतुक केली जात आहे. अशा माहीती वरुन पोलीस स्टेशनचे उमरेडचे पथकाने मोहपा रोड उमरेड या ठिकाणी नाकाबंदी लावुन वाहने चेक करित असतांना १२ चक्का टिप्पर क्र. MH 40 CT 9334 हा रेती भरुन येतांना दिसला त्यास थांबवुन चालकास रॉयल्टी विचारली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगीतले. यावरुन अवैधरित्या रेती वाहतुक करणारा १२ चक्का टिप्पर क्र. MH 40 CT 9334 किं. २०,००,०००/—रू व त्यामध्ये ९ ब्रास विना रॉयल्टी भरलेली रेती किं. ४५,०००/—रू. असा एकूण २०,४५,०००/—रू. चा मुददेमाल जप्त केला आहे. टिप्पर चालक व मालक **आरोपी नामे १) फिरोज खान युसुफ खान वय ५१ वर्षे रा. शिवनगर वंजारी लेआउट उप्पलवाडी नागपूर (चालक), २) समिर हाफिज खान वय ४५ वर्ष रा. साईबाबा नगर खरबी चौक नागपूर** (टिप्पर मालक) यांचे कृत्य कलम ३७९, १०९ भादवी सहकलम ४८(७), ४८(८) महा जमीन महसुल अधिनियम १९६६, सहकलम ४, २१ खाण आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनीक मालमत्ताचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये होत असल्याने आरोपींता विरुध्द गुन्हे नोंद करुन दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. श्री राजा पवार उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग उमरेड यांच्या मार्गदर्शनात पोनि प्रमोद घोंगे, ठाणेदार पोस्टे उमरेड, पोहवा आशिष खोडे, पोकॉ अमोल मांढरे, चापोकॉ उमेश बांते यांनी केली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर